# विद्यापीठाला ऑक्टोबरमध्ये मिळणार नवीन कुलगुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पदासाठीच्या मुलाखतींची प्रक्रिया रविवारी पार पडली. कुलगुरू शोध समितीकडून दोन दिवसात २५ उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी ५ उमेदवारांची नावे कुलपती तथा राज्यपालांकडे सोमवार किंवा मंगळवारी सादर करण्याची शक्यता आहेत. यातून एका उमेदवाराची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात येईल. त्यामुळे आक्टोबरमध्ये विद्यापीठाला नवीन कुलगुरू मिळतील, अशी आशा विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.

कुलगुरू पदासाठीची निवड प्रक्रिया गेल्या सहा महिन्यापासून सुरू आहे. दोन दिवसात २५ उमेदवारांना विद्यापीठबाबत त्यांचे व्हीजन, विद्यापीठ आणि कॉलेज प्रशासनाचा मेळ कसा घालणार, विद्यापीठाची पडती बाजू मजबूत कशी करणार, तुमचे कोणत्या विषयात संशोधन आहे, विद्यापीठातील संशोधन वाढवण्यासाठी काय करणार यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आले. २५ उमेदवारांपैकी ज्यांनी उत्तम मुलाखती दिल्या आहेत. अशा पाच उमेदवारांची नावे कुलगुरू शोध समिती कुलपती तथा राज्यपालांकडे पाठवणार आहे. या पाच उमेदवारांपैकी एका उमेदवाराची निवड कुलगुरूपदी होणार आहे. त्यामुळे नवीन कुलगुरू कोण असणार याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### कुलपतींना पाच उमेदवारांची यादी पाठवणार

शिवाजी विद्यापीठ कुलगुरु पदासाठीच्या मुलाखतीची प्रक्रिया रविवारी पूर्ण झाली. त्यापैकी ५ उमेदवारांची नावे कुलपती तथा राज्यपालांकडे पाठवण्याचा अधिकार कुलगुरु शोध समितीला आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात राज्यपालांकडे ५ उमेदवारांची नावे कुलपती तथा राज्यपालांकडे सादर होतील.

**- आर. के. जैन, कुलगुरू शोध समितीचे नोडल ऑफिसर**

# शोध समितींची प्रक्रिया पूर्ण

## शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रिया

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाच्या निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून अंतिम पाच जणांची नावे कुलपती कार्यालयास सादर केली जाणार आहेत. त्या पाच पात्र उमेदवारांपैकी एकाची निवड कुलपतींकडून केली जाणार आहे. कुलगुरूपदी कोणाची निवड होणार या बाबतीत विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता लागली आहे.

माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कुलगुरूपदाचा कार्यकाल १७ जून रोजी संपला. कुलपती कार्यालयाने कुलगुरू निवड प्रक्रियेंतर्गत इच्छुकांकडून अर्ज मागविले होते. त्या अंतर्गत मुलाखतीसाठी २५ उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली होती. त्यांच्या मुलाखती २६ सप्टेंबर रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आल्या. त्यापैकी अंतिम पाचजणांची नावे निश्चित करून शोध समिती ती कुलपती कार्यालयाला सादर करणार आहे. निवड करण्यात आलेल्या त्या पाच जणांचे सादरीकरण तसेच स्वतंत्र मुलाखती होतील. त्यातून कुलपती एकाची कुलगुरुपदी निवड करतील. त्यामध्ये डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्य डी. जी. कणसे, डॉ. व्ही. जे. फुलारी आदी प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे. कोल्हापूर, सांगली, पुणे, मुंबई, औरंगाबाद, जळगाव अशा विविध शहरांतील शिक्षण संस्था, नामांकित विद्यापीठांतील प्राध्यापकांनी कुलगुरुपदासाठी अर्ज केले आहेत.

# मुलाखतीचा पहिला टप्पा पूर्ण

## कुलगुरू निवड : २५ उमेदवारांच्या व्हीसीद्वारे घेतल्या मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरूपदाच्या निवड प्रक्रियेअंतर्गत शोध समितीकडून पात्र २५ उमेदवारांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मुलाखतींचा पहिला टप्पा पूर्ण झाला.

कुलगुरूपदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू आहे. शनिवारी पहिल्या दिवशी शोध समिती सदस्यांनी १५ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. ऑनलाईन मुलाखतीसाठी उमेदवारांना अर्धा तासाचा वेळ देण्यात आला होता. उमेदवारांनी शोध समितीसमोर ऑनलाईन प्रेझेंटेशन सादर केले.



शिवाजी विद्यापीठातून...

रविवारी होणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखतीही शनिवारी घेण्यात आल्याचे समजते. यामधून पात्र पाच उमेदवारांची नावे निश्चित करून दोन दिवसानंतर कुलपती कार्यालयास सादर केली जाणार आहेत. कुलपती या उमेदवारांच्या स्वतंत्रपणे मुलाखती घेतील. त्यामधून एकाची कुलगुरूपदी निवड होईल.

# कुलगुरू निवडीचा पहिला टप्पा पूर्ण

## २८ जणांच्या मुलाखती ; पाच जणांची निवड दोन दिवसांत

**» शिवाजी विद्यापीठ**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी असणाऱ्या निवड प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झाला. यामध्ये २८ जणांच्या मुलाखती शोध समितीमधील सदस्यांनी घेतल्या. यातील पाच नावांची अंतिम यादी कुलपती कार्यालयाकडे पुढील दोन दिवसांत पाठवली जाईल.

शनिवारी (ता. २६) बहुतांशी उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या. आज शोध समितीने मुलाखतींमधील गुणानुसार अंतिम पाच नावांची निवड करण्याचे काम सुरू केले आहे. पुढील दोन दिवसात अंतिम पाच जणांची निवड करून त्यांची नावे कुलपती कार्यालयाकडे पाठवली जातील. त्यानंतर पाच जणांना मुलाखतींचे मेल पाठवले जातील. कुलपती स्वतः त्यांच्या मुलाखती घेऊन अंतिम नावाची कुलगुरू म्हणून घोषणा करतील. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ही घोषणा होऊन नवे कुलगुरू कार्यभार स्वीकारतील असा अंदाज विद्यापीठ प्रशासनातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. पहिल्या टप्प्यातील मुलाखतींना प्रत्येक उमेदवाराला वीस ते पंचवीस मिनिटेच वेळ मिळाला होता.

# कुलगुरूपदासाठीच्या मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण

## शिवाजी विद्यापीठ : पाचजणांची नावे कुलपतींना सादर करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठीच्या पहिल्या फेरीतील २५ उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कुलगुरु शोध समितीकडून या उमेदवारांमधून पाचजणांची नावे कुलपतींना सादर केली जाणार आहेत.

या पदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. त्यांच्या छाननीतून मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २५ उमेदवारांची कुलगुरु शोध समितीने निवड केली. त्यांतील काही उमेदवारांच्या शनिवारी, तर काहींच्या रविवारी मुलाखती घेण्याचे नियोजन समितीने गेल्या आठवड्यापूर्वी केले होते. त्यानुसार संबंधित उमेदवारांना मुलाखतीचा दिवस आणि वेळ ई-मेलद्वारे कळविली होती.

त्यानुसार शनिवारी १५, तर रविवारी उर्वरित उमेदवारांच्या मुलाखती होणार होत्या. मात्र, समितीकडून शुक्रवारी या नियोजनामध्ये बदल करण्यात आला. रविवारी ज्यांच्या मुलाखती होत्या, त्यांना शुक्रवारी सायंकाळी दूरध्वनी करून त्यांच्या मुलाखती शनिवारी घेण्यात येतील, असे सांगण्यात आले. यासह त्यांना वेळही कळविण्यात आली. त्यानुसार मुलाखतीची प्रक्रिया समितीकडून पूर्ण करण्यात आली.

### नाराजी व्यक्त

मुलाखतीच्या नियोजनामध्ये बदल केल्याने सादरीकरणासाठी अपुरा वेळ मिळाल्याने काही उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली. पूर्वनियोजनानुसार मुलाखती होणे अपेक्षित होते, असे मतही काहींनी व्यक्त केले.